महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार, दि. २२ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७४ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

१६८२ : श्री समर्थ रामदासांचे महानिर्वाण.
१६६६ : शहाजहान बादशहाचे निधन झाले.
१९५८ : संयुक्त अरब प्रजासत्ताक राष्ट्राची.
१९७२ : स्वामी रामानंद तीर्थ यांचे निधन.
१९६३ : अंध लोकांच्या सोयीसाठी डेहराडून येथे राष्ट्रीय ग्रंथालय सुरू झाले.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८१,९०९.६३ | -२७०.८४ (०.३३%) |
| डॉलर | ₹ ९१.५९ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १६ |
| दिल्ली | २५ | ०९ |
| मुंबई | ३३ | १९ |
| नागपूर | ३० | १५ |
| पुणे | ३० | १० |

**सुविचार**

मनाचे पुस्तक अशाच व्यक्तीसमोर उघडा, जो ते वाचल्यावर तुम्हाला समजू शकेल.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०७ | संध्या-६:१२ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५६,६००/- | ३,३०,०००/- |

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# मुंबईच्या बदल्यात एकनाथ शिंदेंना दुसऱ्या शहरात मोठा वाटा मिळवणार?

## नाशिकमध्ये सत्तेची पर्वणी मिळण्याची शक्यता; महापौरपदासाठी आज आरक्षण सोडत

वृत्तसंस्था । नाशिक

**राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी गुरुवारी आरक्षण सोडत काढली जाणार असून कोणत्या शहरात आरक्षणाची सोडत काय निघते, याकडे सगळ्याचंच लक्ष लागलं आहे. मुंबईच्या महापौरपदाबद्दल तिढा निर्माण झालेला असताना महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मुंबई महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत नसून, सत्तेसाठी शिवसेना शिंदे गटाची मदत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे शिंदेसेनाही मुंबईचे महापौरपद भाजपला देऊन त्याच्या बदल्यात राज्यातील अन्य ठिकाणी सत्तेत वाटा पदरात पाडून घेणार आहे. नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत असल्यामुळे नाशिकच्या सत्तेत शिंदेसेनेलाही वाटा हवा असल्याने मुंबईतल्या तडजोडीत नाशिकमध्ये शिंदेसेनेला सत्तेची पर्वणी मिळण्याची शक्यता आहे.**





नाशिकचे महापौर सर्वसाधारण गटासाठी खुले होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तेरा टक्के आरक्षण असल्याने चार महापालिकांमध्ये, तर अनुसूचित जमातीचे आरक्षण सात टक्के असल्याने या समाजाला दोन महापालिकांमध्ये संधी मिळणार आहे. त्यामुळे नाशिकचा क्रमांक येण्याआधीच हा कोटा पूर्ण झाला, तर महापौरपद सर्वसाधारण किंवा ओबीसी गटासाठी आरक्षित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा असेल. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्यानंतर आता महापौरपदाच्या आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. नाशिक महापालिकेत चक्राकार पद्धतीने अनुसूचित जाती गटासाठी आरक्षण निघणार असल्याचे बोलले जात असले, तरी संपूर्ण राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण टाकले जाणार असल्याने यापूर्वी ज्या महापालिकेत या संवर्गासाठी फारपूर्वी आरक्षण काढण्यात आले त्या महापालिकांमध्ये अनुसूचित जाती गटासाठी आरक्षण पडणार असल्याने नाशिकमध्ये नवनिर्वाचित नगरसेवकांचे आरक्षण प्रक्रियेकडे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या सातव्या पंचवार्षिक निवडणुकीत १२२ पैकी भाजपचे ७२ नगरसेवक निवडून आले. गेल्या निवडणुकीत भाजपचे ६६ सदस्य निवडून आले होते. यंदा त्यात सहा सदस्यांची भर पडली आहे. भाजपकडे बहुमतापेक्षा १० सदस्य अधिक असल्यामुळे महापौर भाजपचाच होणार हे स्पष्ट झाले आहे. महापौरपदानंतर महापालिकेचे स्थायी समितीचे सभापतिपद महत्त्वाचे असते. सध्याचे बलाबल पाहता महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्याही भाजपकडेच असतील, हेही स्पष्ट झाले आहे. स्थायीच्या १६ सदस्यांपैकी (पान २ वर)

### ‘स्थायी’ भाजपकडेच

नाशिक महापालिकेत भाजपने सर्वाधिक ७२ जागांवर विजय मिळवत महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवल्यानंतर महत्त्वाची पदेही आता भाजपच्याच ताब्यात राहणार आहेत. महापौर पदानंतर स्थायी समितीच्या चाव्याही भाजपकडे राहणार असून, सभापतिपदासाठी कोणताही संघर्ष भाजपला करावा लागणार नसल्याचे चित्र आहे. सदस्यसंख्येनुसार एकूण १६ पैकी सर्वाधिक १० सदस्य भाजपचे, शिवसेना शिंदे गटाचे ३, शिवसेना ‘उबाठा’चे २ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचा १ सदस्य, अशी पदे मिळण्याची शक्यता आहे.

# यावल शहरात मृताला जिवंत दाखवून तीन हेक्टर शेतजमिनीची विक्री

वृत्तसंस्था । यावल

## • मुंबईतील १२ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल



**मृत व्यक्तीच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करून आणि तो व्यक्ती जिवंत असल्याचे दाखवून सुमारे तीन हेक्टर १९ आर शेतजमिनीची परस्पर विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार यावलमध्ये उघडकीस आला. या प्रकरणी जालन्यातील महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अंबरनाथ, नवी मुंबई, वसई आणि यावल येथील एकूण १२ जणांविरुद्ध यावल पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.**

तक्रारदार कांचन संजय खत्री (५२, रा.जालना) यांचे काका गेलाराम भुरोमल यांच्या नावे यावल तालुक्यातील बोरावल खुर्द येथे गट क्र. १९३ मध्ये मोठी शेतजमीन होती. गेलाराम यांचा मृत्यू १ जानेवारी १९९५ रोजी झाला आहे. मात्र आरोपी अजित तुळशीराम भंडारी (अंबरनाथ) याने मृत गेलाराम यांच्या जागी श्याम मनोहर मुंदडा (वसई) याला बनावट गेलारामम म्हणून दुय्यम निबंधक कार्यालयात उभे केले. त्यांचे बनावट आधारकार्ड आणि पॅनकार्ड तयार करून ही जमीन ११ लाख १५ हजार रुपयांत लाटली.

**असा केला व्यवहार**

या घोटाळ्यात आरोपींनी अत्यंत नियोजनबद्धरीत्या व्यवहार केले. बनावट खरेदीखताच्या आधारे सदर जमिनीचे दोन तुकडे करून १ हेक्टर ४५ आर.जमीन आरोपी सकूबाई धनगर हिच्या नावे तर उर्वरित एक हेक्टर ७४ आर जमीन प्रशांत पाटील याने स्वतःच्या नावावर करून घेतली. या प्रक्रियेत नवी मुंबई आणि विरार येथील आरोपींनी खोटे साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्या तर स्थानिक आरोपींनी जमीन मालकाची खात्री न करता या गुन्ह्यात संगनमत केले.

यापकरणी अजित तुळशीराम भंडारी (ठाणे), श्याम मनोही मुंदडा (पालघर), सचिन हेमचंद राऊत (नवी मुंबई), उमेश चंद्रकांत कदम (४१), सकूबाई दशरथ धनगर, शांताराम (पान २ वर)

### • यांच्याविरोधात दाखल झाला गुन्हा

याप्रकरणी अजित तुळशीराम भंडारी (ठाणे), श्याम मनोही मुंदडा (पालघर), सचिन हेमचंद राऊत (नवी मुंबई), उमेश चंद्रकांत कदम (४१), सकूबाई दशरथ धनगर, शांताराम दशरथ धनगर, रवींद्र दशरथ धनगर, ईश्वर यशवंत पाटील, दिलीप लक्ष्मण धनगर (सर्व रा.बोरावल खुर्द, ता.यावल), किशोर सुरेश माळी आणि शेख युसूफ शेख फारुख (यावल) अशा १२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल महाजन करीत आहेत.

## थोडक्यात

### टी-२० वर्ल्ड कप घरून पाहणं कठीण

**नवी दिल्ली ।** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि हिटमॅन रोहित शर्मा याने आगामी टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. करिअरमध्ये पहिल्यांदाच टी-२० विश्वचषक मैदानाबाहेर बसून पाहणे हा अनुभव आपल्यासाठी खूप वेगळा असेल, असे रोहितने बुधवारी एका मुलाखतीदरम्यान सांगितले. यासह त्याने सिराज, युझी आणि श्रेयसबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असून ते आता केवळ ५० षटकांच्या फॉर्मॅटमध्ये खेळताना दिसतात. आगामी टी-२० विश्वचषकात भारत ७ फेब्रुवारीला मुंबईत अमेरिकेविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे.

### पीएफ क्लेम होणार अधिक वेगवान

**मुंबई ।** देशातील कोट्यवधी पगारदार कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना आपल्या तंत्रज्ञान प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करण्याच्या तयारीत असून, लवकरच हे नवीन व्हर्जन लाँच केले जाणार आहे. या बदलामुळे पीएफशी संबंधित कामे आता बँकिंग प्रणालीप्रमाणेच जलद आणि पारदर्शक होणार आहेत. इपीएफओ ३.० हा केवळ तांत्रिक बदल नसून ती संपूर्ण कार्यप्रणाली आधुनिक करण्याची एक मोहीम आहे. याद्वारे नवीन डिजिटल पोर्टल, प्रगत सॉफ्टवेअर आणि ङ्कोर बँकिंग सिस्टमम लागू केली जाईल. यामुळे ईपीएफ ओचे सर्व प्रादेशिकस्तर एकाच केंद्रीय प्लॅटफॉर्मवर येतील.

### लिव्ह इनमधील महिलांना मिळणार पत्नीचा दर्जा

**मदुराई ।** मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलांच्या बाजूने ऐतिहासिक निकाल दिला आहे. या निर्णयात लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या महिलांना पत्नीचा दर्जा देण्याचे म्हटले आहे. महिलांना कायदेशीर आणि सामाजिक संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी हे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. लग्नाचे खोटे आश्वासन देऊन लैंगिक शोषण करणाऱ्या एका प्रकरणात न्यायालयाचे हे निरीक्षण आले. उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. लग्नाचे खोटे आश्वासन देऊन महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असल्याचा त्याच्यावर आरोप होता. आरोपीने या काळात तिच्याशी अनेक वेळा शारीरिक संबंध ठेवले. नंतर त्याने तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला.

# उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड नाही : राज्यपाल हरिभाऊ बागडे

वृत्तसंस्था । जयपूर

**राजस्थानमध्ये उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. शैक्षणिक दर्जा खराब असलेल्या महाविद्यालये व संस्थांनी तात्काळ सुधारणा कराव्यात, अन्यथा त्यांना बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागेल, असे स्पष्ट निर्देश राज्यपाल व कुलपती हरिभाऊ बागडे यांनी दिले.**



राज्यात ‘सुधारा किंवा बंद करा’ हे धोरण काटेकोरपणे राबवले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.लोकभवन येथे झालेल्या कुलगुरू समन्वय समितीच्या बैठकीत बोलताना त्यांनी परवानगीशिवाय विद्यापीठस्तरीय मान्यता देणाऱ्या संस्थांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही दिला. शिक्षणाच्या गुणवत्तेशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड केली जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. राज्यपालांनी सर्व विद्यापीठांना नॅकच्या रँकिंग सुधारण्यासाठी वेळेत व प्रभावी पावले उचलण्याचे निर्देश दिले. रँकिंगमध्ये येणाऱ्या अडचणी तत्काळ सोडवण्याचे आवाहन करताना, भरती व आर्थिक मंजुरीसंबंधी प्रश्न लवकर निकाली काढले जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले. नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान (पान २ वर)


# कोल्हापूरची सुकन्या अमेरिकेत झाली उपमहापौर

वृत्तसंस्था । कोल्हापूर

## • २०२१ पासून नगरसेविका; दुसऱ्यांदा फेर निवड

**शिक्षणाचे माहेरघर असलेल्या जयसिंगपूर शहराला अमेरिकेतून अभिमानाची बातमी मिळाली आहे. शहरातील चौथ्या गल्लीतील अर्जुनवाडकर कुटुंबातील सुकन्या उर्मिला अशोक पुरंदरे-अर्जुनवाडकर (उमा) यांची न्यूजर्सी प्रांतातील होपवेल टाउनशिपच्या उपमहापौरपदी पुन्हा निवड झाली. या निवडीमुळे जागतिक स्तरावर जयसिंगपूरचे नाव उजळले असून, मराठी महिलेच्या कर्तृत्वाने मराठी मातीचा मान वाढला आहे.**





उर्मिला यांचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण जयसिंगपूरमध्ये झाले. जनार्दन अर्जुनवाडकर यांच्या कुटुंबातील या कन्येने स्थानिक शाळांमधून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम. एससी. ही पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून न्यूजर्सी येथील प्रतिष्ठित औषध कंपनीत गेली २५ वर्षांहून अधिक काळ शास्त्रज्ञ म्हणून कार्य केले आहे. त्यांचे पती डॉ. अशोक विनायक पुरंदरे हेही शास्त्रज्ञ आहेत.

**उल्लेखनीय योगदान आणि सामाजिक सेवा**

उर्मिला यांच्या चार वर्षांच्या कारकिर्दीत आरोग्य, शाश्वत पर्यावरण विकास, शहर संरचना या क्षेत्रांत मोलाचे योगदान दिसून आले. कोविड महामारीनंतरच्या काळात आरोग्य जागृती मोहिमा, लसीकरण कार्यक्रम आणि इमर्जन्सी सेवांसाठी शेअर्ड सर्व्हिसेस करार (पान २ वर)

### • राजकीय कारकिर्द आणि निवडणूक यश...

होपवेल टाउनशिपमध्ये उर्मिला यांनी २०२१ पासून नगरसेविका (टाउनशिप कमिटी मेंबर) म्हणून प्रवेश केला. २०२४ च्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक उमेदवार म्हणून त्यांनी ६,०२३ मते मिळवून (६१.८३ टक्के) प्रतिस्पर्धी बाब झॅन्सिटिस यांच्यावर (२५१ मते) मोठा विजय मिळवला. या यशानंतरच त्यांना २०२४ मध्ये उपमहापौरपदाची धुरा सोपविण्यात आली होती. आता २०२६ मध्ये पुन्हा ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली असून, त्या ३ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२७ या कालावधीसाठी बोर्ड ऑफ हेल्थ, पर्यावरण कमिशन, प्लॅनिंग बोर्ड आदी विभागांचे प्रतिनिधी आहेत.

# चंडीगड, दिल्लीहून जळगाव-भुसावळमार्गे नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्या धावणार

## • ‘हिंद दी चादर’निमित्त दोन दिवस धावणार नांदेडसाठी विशेष रेल्वे

प्रतिनिधी । जळगाव

**‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे शनिवारी आणि रविवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी रेल्वे प्रशासनाने जळगाव- भुसावळमार्गे चंडीगड आणि दिल्ली (हजरत निजामुद्दीन) येथून दोन दिवस विशेष सुपरफास्ट रेल्वे गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.**

‘हिंद दी चादर’श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात आहे. त्याअनुषंगाने चंडीगडसह दिल्ली आणि मुंबईहून दोन दिवस विशेष रेल्वे गाड्या चालविण्यात येणार आहेत. या विशेष रेल्वे व्यवस्थेमुळे पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रातील विविध भागांतून नांदेडला येणाऱ्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान,



रेल्वे प्रशासनाने प्रवाशांनी सर्व आवश्यक नियमांचे पालन करावे. तसेच सुरक्षित व सुयोग्य प्रवासासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, उत्तर भारतातून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी ०४४९४/०४४९३ हजरत निजामुद्दीन (दिल्ली) ही विशेष गाडी येथून २३ आणि २४ जानेवारी रोजी दुपारी १२:३० वाजता नांदेडसाठी सुटणार आहे. ही गाडी पानिपत, आग्रा कॅन्ट, विरांगणा लक्ष्मीबाई झांसी, बिना, भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि पूर्णा मार्गे धावून दुसऱ्या दिवशी दुपारी ०४:२० वाजता नांदेडला पोहोचणार आहे.

याशिवाय ०४५२४/०४५२३ चंडीगडनांदेड ही चंडीगडहून २३ आणि २४ जानेवारी रोजी सकाळी ०५:४० वाजता सुटणारी विशेष गाडी अंबाला, पानिपत, दिल्ली सफदरजंग, आग्रा, झांसी, भोपाळ, इटारसी, खंडवा, भुसावळ, जळगाव, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि पूर्णा मार्गे प्रवास करून दुसऱ्या दिवशी दुपारी ०१:३० वाजता नांदेडला पोहोचणार आहे.

मुंबईतुनही विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ०१०४१/०१०४२ लोकमान्य टिळक टर्मिनसनांदेड ही विशेष गाडी २३ आणि २४ जानेवारी रोजी दुपारी ०३:३० वाजता मुंबईहून सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ०४:०० वाजता नांदेडला (पान २ वर)

# अमली पदार्थ तस्करीप्रकरणी सलमान खानला अटक



वृत्तसंस्था । मुंबई

**अमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी आलेल्या एका सराईत आरोपी सलमान खानला कुर्ला पोलिसांनी अटक केली. या आरोपीकडून पोलिसांनी ३० हजार रुपये किमतीचे एमडी जप्त केले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.**

गेल्या काही दिवसांपासून मुंबई शहरात अमली पदार्थांच्या तस्करीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी परिसरात रात्रीच्या वेळी गस्त घालण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले आहेत. त्यानुसार सोमवारी रात्री कुर्ल्याच्या मेट्रो हॉटेल परिसरात पोलिस गस्त घालत होते. यावेळी त्यांना परिसरात एक व्यक्ती संशयास्पद फिरत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला असता तो पळ लागला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. झडती (पान २ वर)

# संपादकीय

## खुलासा हवाच

गेल्या दोन-तीन दिवसात हिंदू धर्मियांच्या भावना दुखावतील अशा दोन घटना घडल्या आहेत. मौनी अमावस्येच्या दिवशी शंकराचार्यांचे प्रयागराजच्या संगमावर जे पारंपरिक स्नान होणार होते त्या स्नानालाच अडथळा आणला गेला, या स्नानासाठी निघालेले शंकराचार्य श्री अविमुक्तेश्वरानंद यांना आणि त्यांच्या समर्थकांना घाटावरून हुसकावून लावण्यात आले. त्यांच्या समर्थक संन्यासी भक्तांची तर पोलीस यंत्रणेकडून शब्दशः ससेहोलपट करण्यात आली. शंकराचार्यांचा रथ तिथून काही माणसांकरवी एक किलोमीटर लांब नेऊन सोडण्यात आला. दुसरी घटना वाराणसीच्या गंगा काठावरील आहे. तेथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी सुमारे तीनशे वर्षांपूर्वी जे मंदिर आणि घाट उभारला होता त्याची मोडतोड केली गेली. घटनास्थळी पडलेल्या मूर्तींचे व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाले. या घटनेवरही देशभरातून तीव्र संताप व्यक्त केला जाऊ लागला. मनकर्णिका घाटावरील घटनेच्या संबंधात मग थेट मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीच एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन असा खुलासा केला आहे की, मनकर्णिका घाटावर कोणतीही मोडतोड झालेली नाही आणि जे व्हिडिओ सोशल मीडियात पसरवले गेले आहेत ते एआय जनरेटेड व्हिडिओ आहेत. हे व्हिडिओ पसरवणाऱ्या आठ जणांच्या विरोधात त्यांच्या सरकारने गुन्हेही दाखल केले. पण वस्तुस्थिती अशी आहे की मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीच याबाबतीत दिलेली माहिती खोटी असल्याचे प्रशासनातल्या अधिकाऱ्यांच्या वक्तव्यातूनच स्पष्ट झाले आहे. वाराणसीचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक या दोघांनीही घाटावरील मूर्तींची मोडतोड झाल्याचे मान्य केले आहे. मात्र त्यावर सारवासारव करताना त्यांनी असे नमूद केले की या घाटाचा आता पुनर्विकास केला जाणार असून तेथील प्राचीन मूर्ती नव्याने साकारल्या जाणाऱ्या मंदिरात प्रस्थापित केल्या जातील. या अधिकाऱ्यांचा काहीही खुलासा केला असला तरी तेथे असा प्रकारच घडला नाही आणि सोशल मीडियावरील व्हिडिओ क्लिप एआय जनरेटेड आहेत हा मुख्यमंत्री योगींचा दावा तद्दन खोटा ठरला आहे. मनकर्णिका घाट फोडला जात असताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या घराण्यातील वारसांनी आणि त्यांच्याशी संबंधित विश्वस्तानी याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत तेथील मूर्ती स्वतः जतन करण्याची तयारी दर्शवली होती; पण त्याला प्रशासनाने दाद दिली नाही. या घटनेबद्दल भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि लोकसभेच्या माजी खासदार सुमित्रा महाजन यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे ही घटना घडली नाही असे मुख्यमंत्री योगी जाहीरपणे कसे काय म्हणू शकतात हा प्रश्न आता लोकांना पडला आहे. हा मुद्दा उचलून धरणारे आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांच्यावरही मनकर्णिका घाट प्रकरणातील एआय जनरेटेड व्हिडिओ प्रसारित केल्याच्या कारणावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता वस्तुस्थिती उघड झाल्यानंतर मुख्यमंत्री हे गुन्हे मागे घेणार आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मुळात वाराणसीच्या या जुन्या घाटाचे प्राचीन सौंदर्य काळजीपूर्वक जपणे अपेक्षित असताना तेथे विकासाच्या नावाखाली सरसकट बुलडोजर चालवणे हे कोणत्या गणितात बसते हे लोकांच्या लक्षात येईनासे झाले आहे. योगी सरकारला आणि पर्यायाने मोदी सरकारला हिंदू धर्मियांच्या प्राचीन मंदिरांविषयीही आता कसलीही आस्था उरलेली नाही काय असा संतप्त सवाल विचारला जाऊ लागला आहे.

# जळगाव मनपाच्या प्रभाग क्रमांक २ मधून उज्ज्वला बाविस्कर यांची विजयाची 'हॅट्ट्रिक'

### • चौफेर विकासाचा धुव्वाधार बॅटिंगने झाले सामनावीर..!

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिका निवडणूक आखाड्यात प्रभाग क्रमांक २ मधून उज्वलाताई किशोर बाविस्कर ह्यांनी 'हॅट्ट्रिक' मिळवत विरोधकांना चांगलीच धुळ चारली आहे. चौफेर विकास कामांचे षटकार वर षटकार ठोकल्याने कांचन नगर, शिवाजी नगरासह संपूर्ण प्रभाग ढवळून निघाल्याने विजयाचा 'वार्ड' कप पटकावून पुन्हा प्रभागाचे कॅप्टन झाले आहेत.**



एकंदरीत नगरवासियांच्या सेवेची संधी प्राप्त झाली असल्याने अजून जनसेवेचे ग्राऊंड गाजवावे लागणार आहे. त्यांच्या सोबतीला माजी नगरसेवक पती किशोरआप्पा बाविस्कर यांना उभे राहावे लागणार आहे. हे धुरंधर दाम्पत्य आता नव्या जोमाने उरल्या सुरल्या कामांचा धडाका लावतीलच या आशेने मतदार राजाने भरभरून प्रेम दिले आहे. पहिल्या टर्मला ४००मतांची आघाडी होती नंतर दुसऱ्या टर्ममध्ये २५०० आणि आता सन २०२६च्या निवडणुकीत एकदम ५०००मतांनी आघाडी घेत विजयाचा विक्रम केला आहे.

उज्वलाताई बाविस्कर ह्यांनी प्रभाग क्रमांक दोन मध्ये कांचननगर, शिवाजीनगर, चौगुले प्लॉट , रेल्वे यार्ड भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते, डांबरीकरण रस्ते, आवश्यक त्या ठिकाणी सिमेंट पाईप, अमृत पाणी योजना, ड्रेनेज, पेव्हर ब्लॉक, आरसीसी गटार, कनव्हर्ट, क्रीडांगण, प्ले सेंटर, सुशोभीकरण आदी भरगच्च विकास कामे करून मतदारांच्या ओठावर आपले नाव कोरले आहे. त्यामुळे त्यांचा विजय पक्का झाल्याची प्रतिक्रिया जनसामान्यांतून उमटत आहे. प्रभागात ७५ हायमास्ट एलईडी लॅम्पचे काम करून २० ठिकाणी इलेक्ट्रिक डीपी बसवून परिसरात प्रकाशाच्या लखलखाट केला आहे त्याचप्रमाणे घरोघरी शौचालय मंजूर करून रहिवाशांना न्याय दिला आहे.

एवढेच नव्हे संपूर्ण परिसरात २५ महादेव मंदिरे बांधून धार्मिक व पारमार्थिक वातावरण निर्माण होण्यात सिंहांचा वाटा मिळविला आहे. १५ ठिकाणी बोअरवेल करून पाण्याची तहान भागवण्याचे पुण्णयाचे काम केले आहे. लहान मुलांसाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. असे एक ना अनेक जनहिताचे कामे केल्याने सौ . उज्वलाताई बाविस्कर ह्यांचा विजयाची लकीर कोरली गेली आहे.येत्या पाच वर्षांत विकासाचा पारा महानगरात नंबर वन राहील अशी आशा निर्वासितांनी व्यक्त केली आहे.

# सद्गुरू साई सतरामदास साहेब यांच्या वर्सी महोत्सवास आजपासून सुरूवात

प्रतिनिधी । जळगाव

**हजुरी रूप साई साधराम साहेब यांच्या आज्ञा व आशीर्वादाने शहनशाह सद्गुरू साई सतरामदास साहेब यांचा ११६ वा वार्षिक वर्सी महोत्सव संत सतराम धाम, गणपती नगर, जळगाव येथे गुरुवार दि. २२ जानेवारीपासून सुरू होत आहे. हा महोत्सव २४ जानेवारीपर्यंत तीन दिवस विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे.**

**या वर्सी महोत्सवाचे आयोजन एस.एस.डी. परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.**



महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी ६ वाजता श्री अखंड धुनी साहेबच्या पाठ साहेबने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. रात्री ९ वाजता नामसिमरन व एस.एस.डी. म्युझिकल पार्टी यांच्या माध्यमातून शहनशाह सद्गुरू संत सतरामदास साहेब यांच्या जीवनकार्यावर आधारित भक्तिगीत व भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच समाजातील सर्व बांधव व भगिनींसाठी तीनही दिवस आम भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी साई सतरामदास ट्रस्ट व साई सतरामदास परिवार यांच्यासह चेतनदास कारडा, इंदरलाल परसवानी, शंकरलाल पाहुजा, राजेश भक्तानी, नारायण तलरेजा, मनोहरलाल केवलरामानी, सुरेश गलानी, सतीश रावलानी, जवाहर तलरेजा, महेंद्र पाहुजा, दिलीप नानवानी, धीरज तलरेजा, विजय हासीजा, चेतन चुग, जीतू मकरेजा, राजेश पोपली, अनिल कुकरेजा, नितीन हेमनानी, तसेच महिला मंडळातील सरला तलरेजा, मोहिनी तलरेजा, शारदा मंधान, मीना पाहुजा यांच्यासह अनेक भाविक परिश्रम घेत आहेत. तरी सर्व सिंधी समाजबांधवांनी व भाविकांनी या वर्सी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन संतांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# रोटरीच्या टिफिन रेसिपी स्पर्धेत सोनवणे, अनंत, रडे, वाटवे विजयी

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगावच्या आरसीसी क्लब ऑफ राईपच्यावतीने आयोजित टिफिन रेसिपी स्पर्धेत स्नेहा सोनवणे यांनी प्रथम तर सुनिता अनंत यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. मीनल रडे तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या तर कल्याणी वाटवे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.**




परिक्षक म्हणून हर्षाली चौधरी व मधुरा जहागिरदार यांनी काम पाहिले. आपल्या मनोगतात त्यांनी सर्वच पदार्थ छान बनविले आहेत मात्र स्पर्धा असल्याने नाविन्यता, पदार्थाचे पौष्टिक मुल्य, लागणारा कालावधी व वापरलेले घटक यांचा विचार करण्यात आल्याचे सांगितले. तेलाचा वापर कमी करुन शेंगदाण्यांना पर्याय म्हणून खोबरे, मगज आदींचा तर रव्यासारख्या प्रक्रिया केलेल्या वस्तु ऐवजी ओट्ससारख्या मुळ पदार्थाचा वापर करावा असे आवाहन केले. स्नेहा सोनवणे यांनी बक्षीस मिळाले याचा आनंद आहे, त्यामुळे आत्मविश्वास वाढला असे म्हणाल्या. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत मुलांच्या खाण्याच्या सवयींमध्ये मोठा बदल झाला असून त्यातून विविध आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्यदायी, पौष्टिक व पारंपरिक पदार्थांचा समावेश असलेले टिफिन पर्याय समोर यावेत, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी सांगितले. आरसीसी ऑफ राईपच्या अध्यक्षा पल्लवी शिंपी व प्रोजेक्ट चेअरमन मीनाक्षी सुतार यांच्या विशेष प्रयत्नातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विनिता भट यांनी सुत्रसंचालन तर मानद सचिव योगिता पाटील यांनी आभार मानले. आदिती कुळकर्णी, स्वाती ढाके, डॉ. शुभदा कुलकर्णी, विनया जोशी, हर्षदा भंगाळे, प्रतिभा शिंपी, स्वाती महाजन, कल्पना शिंपी, योगेश गांधी, रितेश जैन, उल्हास सुतार आदी उपस्थित होते.

# कास्ट्राईब महासंघातर्फे नगरसेवक अनिल अडकमोल यांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रं.१२ मधून विजयी झालेले नवनिर्वाचीत नगरसेवक अनिल अडकमोल यांचा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने सत्कार करण्यात आला.**

जळगाव महानगरपालीका निवडणुकीत प्रभाग क्रं.१२ मधून अनिल अडकमोल यांनी भाजपाकडून उमेदवारी दाखल केली होती आणि मोठ्या विजयी झाले. विजयी झाल्याबद्दल त्यांचा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी नाशिक विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे, जिल्हाध्यक्ष पुलकेशी केदार, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, मनपाचे जिल्हाध्यक्ष सुरेश भालेराव, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश अडकमोल, महसूल विभागाचे विलास डोंगरे, जलसंपदाचे जिल्हा सचिव जिभाऊ हटकर, मनपाचे सचिव नंदकुमार गायकवाड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे नितीन सोनवणे, राहुल मोरे, किशोर साळुंके, भिमराव पवार, गोपीचंद भालेराव उपस्थित होते.

# बंधुतेचे तिळगूळ उपक्रमातून दिला सामाजिक एकतेचा संदेश

प्रतिनिधी । जळगाव

**मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जोपासण्यासाठी जळगाव येथील काव्य रत्नावली चौक येथे बंधुतेचे तिळगूळ या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'तिळगुळ घ्या, बंधुतेने वागा' असा संदेश देत सर्वधर्मीय नागरिकांना एकत्र आणून हा सण साजरा करण्यात आला.**

यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानातील विविध मूल्यांचा, विशेषतः बंधुता या मूल्याचा प्रचार आणि प्रसार करण्यावर भर दिला. केवळ सण म्हणून नव्हे, तर एकमेकांबद्दल आदर आणि समतेची भावना ठेवून आपण सर्वांनी जीवन जगले पाहिजे, असा मोलाचा संदेश या माध्यमातून नागरिकांना देण्यात आला. या कार्यक्रमाला समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. यामध्ये सुष्मिता भालेराव, निखिल रांजणकर, श्रद्धा राजेंद्र, अजय पाटील, मीनाक्षी चौधरी, महेश शिंपी, पल्लवी शिंपी, इरफान पिंजारी, रमेश भोळे, सागर साळुंके, प्रसेनजीत लभाणे, किरण नाईक, शोभा बोऱ्हाडे, प्रल्हाद बोऱ्हाडे, प्रा.दिगंबर कट्यारे, अमोल कोल्हे यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

# कठोरा येथे विठ्ठल आफ्रो बीसीआयमार्फत बायोचारवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील कठोरा येथे विठ्ठल आफ्रो बीसीआय संस्थेच्यावतीने शेतकऱ्यांना सुधारित कापूस आदर्श पद्धत प्रकल्प अंतर्गत मार्गदर्शन करण्यात आले व प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात आले.**



संस्थेचे कृषिमित्र कपिल पाटील यांनी बायोचार करण्याविषयी माहिती देऊन बायोचार करण्याचे फायदे विशद करून जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढून उत्पादकता कशी वाढते ते सांगितले.यामुळे जमिनीतील जिवाणू वाढीसाठी पोषकता निर्माण होऊन कमी खर्चात शेतकरी चांगले खत निर्मिती करू शकतो. माहिती सह शेतकऱ्यांशी चर्चा करून यावेळी त्यांनी प्रात्यक्षिकाही करून दाखवले. यावेळी गावातील प्रगतशील शेतकरी बांधव व कृषि सेवा केंद्र चालक आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक कृषी मित्र कांतिलाल पाटील यांनी केले तर दीपक मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सरिता बाविस्कर व सहकाऱ्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# पान १ वरुन

**चंडीगड, दिल्लीहून जळगाव......**

पोहोचेल. ही गाडी ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी येथे थांबणार आहे. परतीच्या प्रवासात हीच गाडी २४ आणि २५ जानेवारी रोजी रात्री ११:३० वाजता नांदेडहून सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी ०१:४० वाजता मुंबईत दाखल होईल. या गाडीत १८ डबे असून, स्लीपरसह जनरल व एसी कोचची सुविधा उपलब्ध असेल.

**अमली पदार्थ तस्करीप्रकरणी......**

घेतली असता त्याच्याजवळ ३० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम एमडी हा अंमली पदार्थ सापडला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून सलमान खान (२९) याला अटक केली. तो धारावी येथील रहिवासी असून याप्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

**यावल शहरात मृताला......**

दशरथ धनगर, रवींद्र दशरथ धनगर, ईश्वर यशवंत पाटील, दिलीप लक्ष्मण धनगर (सर्व रा.बोरावल खुर्द, ता.यावल), किशोर सुरेश माळी आणि शेख युसूफ शेख फारुख (यावल) अशा १२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल महाजन करीत आहेत.

**उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेशी......**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. भारतीय इतिहास, संस्कृती व मूल्यांशी संबंधित अभ्यास मजबूत करण्याचे निर्देश देत, शिक्षक-विद्यार्थी संवाद वाढवण्यावर त्यांनी भर दिला. तसेच, सर्व विद्यापीठांनी दरवर्षी कमी खर्चात दीक्षांत समारंभ आयोजित करावेत, नियमित ऑडिट करावे आणि गावे दत्तक घेऊन शिक्षण, कौशल्य विकास व ग्रामीण विकासासाठी कार्य करावे, असे निर्देशही राज्यपालांनी दिले.

**कोल्हापूरची सुकन्या अमेरिकेत......**

यावर त्यांनी नेतृत्व केले. पर्यावरण संवर्धन धोरणांमुळे होपवेल टाउनशिपला न्यूजर्सी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. तसेच, शहर संरचनेसाठी कोट्यवधी डॉलरची गुंतवणूक आकर्षित करण्यात त्यांचा विशेष वाटा आहे. सार्वजनिक वाहतूक सुधारणा आणि ग्रामीण पर्यावरण संरक्षणासाठीही त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत. औषध शास्त्रज्ञ म्हणून त्यांचा अनुभव येथील आरोग्य सेवांना बळकटी देत आहे.

**मुंबईच्या बदल्यात......**

१० सदस्य भाजपचे असणार असल्याने सभापती निवडीसाठी भाजपकडे बहुमत असेल. त्यामुळे स्थायीचे सभापतिपदही भाजपकडेचे राहणार यात शंका नाही. त्यामुळे महापालिकेची सत्ता राखताना भाजपने स्थायी समितीच्या चाव्याही आपल्याकडे ठेवल्या आहेत. महापौरपद निवडणुकीच्या पहिल्या सभेनंतर स्थायी समिती सदस्यांची निवड घोषित केली जाईल.

महापालिकेतील एकूण १२२ सदस्यसंख्या लक्षात घेता स्थायी समितीच्या सोळा सदस्यांच्या नियुक्तीसाठी ७.६२५ चा कोटा आवश्यक ठरणार आहे. त्यानुसार ७२ नगरसेवक संख्या असलेल्या भाजपला दहा, २६ नगरसेवक असलेल्या शिवसेनेला ३ जागा मिळतील. १५ नगरसेवकसंख्या असलेल्या 'उबाठा'ला दोन, तर ४ नगरसेवक असलेल्या राष्ट्रवादीला उतरत्या क्रमानुसार एक जागा मिळू शकते. काँग्रेसकडे तीनच नगरसेवक असल्याने काँग्रेसला स्थायी समिती सदस्यपदाची संधी मिळू शकणार नसल्याचे चित्र आहे.

# प्रात्यक्षिकातून गणित, विज्ञान विषय होईल सोपा : डॉ.जोशी

प्रतिनिधी । जळगाव

**विज्ञान व गणित हे विषय मूळतः रंजक असून योग्य पद्धतीने समजावून सांगितल्यास विद्यार्थ्यांमध्ये त्याबाबत उत्सुकता निर्माण होते. मात्र हे विषय केवळ खडूफळ्यावर मर्यादित ठेवल्यास ते कठीण वाटू लागतात व विद्यार्थी त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे शिक्षकांनी गणित व विज्ञान विषय प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिकवावेत, असे प्रतिपादन रमण सायन्स टेक्नॉलॉजी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रमौली जोशी यांनी केले.**



नूतन मराठा महाविद्यालयातील सभागृहामध्ये नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित स्टेम कार्यशाळेचे आयोजन रमण सायन्स टेक्नॉलॉजी फाउंडेशन, माध्यमिक शिक्षण विभाग जळगाव व नूतन मराठा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विमलाई गणित, विज्ञान मालेचे चौथे पुष्प गुंफण्यात आले. या कार्यशाळेत जिल्ह्यातील विज्ञान व गणित शिक्षकांचा संवाद साधण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रमौली जोशी होते. व्यासपीठावर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.माधुरी पाटील, उपशिक्षणाधिकारी सचिन परदेशी, प्राध्यापक राजेश देशमुख, जळगाव जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष किशोर राजे आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील ५९ शिक्षकांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. या वेळी डॉ. जोशी यांनी गणितातील विविध गमती-जमती, सोप्या युक्त्या तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून दाखवली. याच पद्धतीने शाळांमध्ये अध्यापन केल्यास गणित व विज्ञान विषय विद्यार्थ्यांना निश्चितच सोपे व आवडते होतील, असे त्यांनी सांगितले.

**जीवनातील उदाहरणे वापरण्याचा सल्ला**

गणित व विज्ञान शिकविताना आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा वापर करावा. यामुळे विषय विद्यार्थ्यांना जवळचा व ओळखीचा वाटतो आणि त्यांच्या अध्ययनातील गोडी वाढते, असे मत उपशिक्षणाधिकारी सचिन परदेशी यांनी व्यक्त केले. यावेळी नॅशनल कौन्सिल ऑफ टीचर्स सायंटिस्टचे सचिव संदीप पाटील, एपीजे अब्दुल कलाम नॅशनल कौन्सिल ऑफ यंग सायंटिस्टचे चेअरमन सुनील वानखेडे, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे सहसचिव सी.डी. पाटील, सदस्य निरंजन पेंढारे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गायत्री सरोदे यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
※ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (※ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# धुळे सहा.रचनाकार, सहा.आरेखकासह जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी । धुळे

**औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यासाठी तडजोडीअंती ३० हजारांची लाच मागून ती स्वीकारताना धुळ्यातील नगर रचना विभागातील सहा.रचनाकार (वर्ग २), सहा. आरेखक (वर्ग ३) व धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यकाला धुळे एसीबीने बुधवार, दि.२१ रोजी सायंकाळी रंगेहाथ अटक केली आहे. या कारवाईने दोन्ही विभागातील लाचखोरांची साखळी समोर आल्याने धुळे जिल्ह्यातील लाचखोर प्रचंड धास्तावले आहेत. विशेष म्हणजे अटकेतील संशयीत हे वर्ग दोन व वर्ग तीनचे मोठे अधिकारी आहेत.**

लाच प्रकरणी धुळे नगररचना विभागातील सहा.रचनाकार कल्पेश चवरे व सहाय्यक आरेखक किशोर भोई तसेच जिल्हाधिकारी



कार्यालयातील महसूल सहाय्यक आनंदा हटकर यांना लाच प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

**असे भोवले लाच प्रकरण**

तक्रारदाराला औद्योगिक प्रयोजनासाठी दहा हजार चौरस मीटर शेजतमीन मंजूर करायची असल्याने ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाईन प्रकरण सादर करण्यात आले तसेच ऑफलाईन कागदपत्रेही सादर करण्यात आली. धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आनंदा हटकर यांनीदेखील बिनशेती आदेश देण्याच्या मोबदल्यात २० हजारांची लाचेची मागणी केल्यानंतर १० हजार रुपये देण्याचे ठरले होते तर नगर रचना विभागातील दोन्ही लाचखोरांनी ५० हजार रुपये मागितल्याने ३० हजार रुपये देण्यावर तडजोड झाली व धुळे एसीबीकडे तक्रार नोंदवण्यात आली. एसीबीने लाच पडताळणी केल्यानंतर बुधवार, २१ रोजी सायंकाळी सापळा रचला कल्पेश चवरे यास लाच स्वीकारताच अटक करण्यात आली व नंतर दोन्ही लाचखोरांनाही पकडण्यात आले.

ही धाडसी कारवाीई धुळे एसीबीचे डॅशिंग पोलिस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या नेतृत्वात पोलिस निरीक्षक यशवंत बोरसे व सहकाऱ्यांनी बुधवारी सायंकाळी केली.

धुळे जिल्ह्यातील लाचखोरांविरोधात धुळे एसीबीने मोहिम तीव्र केल्याने लाचखोरांनी धसका घेतला आहे. नववर्षाच्या सुरूवातीला तब्बल चार बड्या कारवाया एसीबीने केल्यानंतर आता धुळे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच नगररचना विभागातील साखळीच कारवाईनिमित्ताने समोर आल्याने खळबळ उडाली आहे. शासकीय करून देण्यासाठी कुणीही लाच मागत अथवा घेत असल्यास धुळे एसीबीकडे तक्रार करावी, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे (मो.९४०३७-४७१५७) यांनी केले आहे.

## पालकमंत्री रावल यांच्या उपस्थितीत आज जिल्हा नियोजन समितीची बैठक

प्रतिनिधी । धुळे

**राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज, दि.२२ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नविन नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव भाग्यश्री विसपुते यांनी दिली आहे.**

बैठकीत अनुपालनास मान्यता देणे. जिल्हा वार्षिक योजना जिल्हा नियोजन समितीच्या १२ जुलै, २०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील इतिवृत्तावरील २०२५-२०२६ (सर्वसाधारण योजना, आदिवासी घटक कार्यक्रम व अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) या वार्षिक योजनांचा डिसेंबर, २०२५ अखेर झालेला खर्चास मान्यता देणे. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२०२६ (सर्वसाधारण योजना, आदिवासी घटक कार्यक्रम व अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) या योजनांचा अंतरीम पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यता देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२०२७ (सर्वसाधारण योजना, आदिवासी घटक कार्यक्रम व अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) च्या प्रारुप आराखड्यास मान्यता देणे तसेच आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीस सर्व संबंधित यंत्रणेच्या विभाग प्रमुखांनी विषयांच्या १५ मिनिटे अगोदर उपस्थित कार्यान्वियीन योजनानिहाय सविस्तर माहितीसह बैठक सुरु होण्यापुर्वी रहावे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव भाग्यश्री विसपुते यांनी कळविले आहे.

## थोडक्यात

### महापालिका निकालानंतर वाद; चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** महापालिका निवडणूक निकालानंतर १६ रोजी सायंकाळी शहरातील मोगलाई परिसरातील जगदीश नगरात अतिउत्साही तरुण पराभूत उमेदवारांच्या घराजवळ फटाके उडविण्यासाठी आले. त्यांना टोकले असल्याचा राग येऊन संशयित भूपेंद्र रसिया, मंथन जगदीश सूर्यवंशी, योगेश एकनाथ सपकाळ व हर्षल लिंगाडे (चौघे रा. मोगलाई, धुळे) यांनी पराभूत उमेदवारांच्या पत्नीस शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांच्यासह देराणीचा लज्जास्पद इशाऱ्याद्वारे विनयभंग केला. महिलेच्या फिर्यादीवरून चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आर्थिक साक्षरता शालेयस्तर प्रशिक्षण

**शिरपूर ।** शहरातील एच. आर. पटेल कन्या मराठी माध्यमिक विद्यालयात आर्थिक साक्षरता शालेय स्तर प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. हे प्रशिक्षण एचडीएफसी सिक्युरिटीज आणि एम्प्लॉहर फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. प्रशिक्षक एस.के. कोठावदे व जी. आर. राजपूत यांनी मार्गदर्शन केले. यात पैसे म्हणजे काय ? पैशाचे कोणकोणते उपयोग असतात ? पैशांचे कोणते प्रकार आहेत ? याबद्दल माहिती देताना पैशांचा इतिहास सांगितला. वस्तू विनिमय, वस्तू स्वरूपात पैसा, नाणी धातूचा पैसा, कागदाचा पैसा आणि डिजिटल मनी याबद्दल माहिती दिली. गरज व इच्छा यातील फरक, उत्पन्न व खर्चाचे समीकरण तसेच बँकेचे कामकाज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्राचार्य एस.जे. पाटील यांनी आर्थिक साक्षरतेमध्ये विद्यार्थ्यांनी पैशाची बचत कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले.

## अक्कलकुवा तालुक्यात पाणीटंचाई निवारणासाठी ३० टँकरचे वितरण

प्रतिनिधी । अक्कलकुवा

**नावीन्यपूर्ण योजनेतुन पाणी टंचाई निवारणासाठी अक्कलकुवा तालुक्यातील ग्रामपंचायतींना मंजूर झालेल्या ३० टँकरचे वितरण आ. आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात आले.**




अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील असुन ज्या ज्या गोष्टी तातडीने करता येतील त्यासाठी त्या प्राधान्याने करण्याचे नियोजन असल्याचे प्रतिपादन आमदार आमश्या पाडवी यांनी केले. सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात वार्षिक नावीन्य पुर्ण योजनेतुन पाणी टंचाई निवारणासाठी अक्कलकुवा तालुक्यातील ग्रामपंचायतींना मंजूर झालेल्या ३० टँकरचे वितरण आमदार आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. आमश्या पाडवी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. अक्कलकुवा तालुक्यातील अनेक गावात पाणी टंचाई असल्याने पाणी टंचाई निवारणासाठी आ. आमश्या पाडवी यांनी वार्षिक नाविन्यपुर्ण योजनेतून पाण्याच्या टँकरची मागणी केली. त्या अनुषंगाने तत्कालीन पालकमंत्री ना. माणिकराव कोकाटे यांनी ३० टँकर मंजुर केले होते. त्याचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख लक्ष्मण

वाडिले, तालुका प्रमुख तुकाराम वळवी, ललित जाट, राजेंद्र वसावे, सरपंच वसंत वसावे, उषा बोरा, विनोद वळवी, आनंद वसावे, इमरान मक्राणी, हिरामण पाडवी, रोहीत चौधरी, दुर्गा पाडवी, कंचन पाडवी, रवी पाडवी आदी उपस्थित होते. याप्रसंगी लक्ष्मण वाडिले, हिरामण पाडवी, ललित जाट, कंचन पाडवी, ज्योती तडवी, दुर्गा पाडवी, रवी पाडवी आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रविंद्र गुरव यांनी केले.

उपस्थितांचे आभार सुधीरकुमार ब्राम्हणे यांनी मानले. कार्यक्रमाला सरला वळवी, निता माळी, संध्या पाटील, छाया वळवी, मथुराबाई पाडवी, आदी उपस्थित होते. पाणी टंचाईच्या निवारणासाठी ग्रामपंचायतींना पाण्याचे टँकर मिळाल्याने गावांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## बोरद येथे कापूस खरेदी केंद्र सुरु

प्रतिनिधी । बोरद

आ.राजेश पाडवी यांचा प्रयत्नामुळे बोरद येथे कापूस निगम (सीसीआय) तफे श्याम फाइबर्स जिनिंग कापूस मिल मध्ये कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्याने परिसरातील खाजगी व्यापाऱ्यांना चांगलीच चपराक बसली आहे. याबाबत दैनिक देशदूतने पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्याची शासनाने व आ.राजेश पाडवी यानी दखल घेतली असून बोरद येथे कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे.

## रॅलीतून ई-कचऱ्यावर जनजागृती आणि संकलन

प्रतिनिधी । नंदुरबार

**तालुक्यातील गुजरभवाली येथील के. डी. गावीत प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात ई-कचरा संकलन उपक्रमाअंतर्गत गावातून मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यासह रॅली काढण्यात आली.**

रॅलीचे उद्घाटन उपसरपंच प्रकाश गावीत यांच्याहस्ते झाले. रॅलीत विद्यार्थ्यांच्या घोषणांनी तसेच बॅनर यांनी गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीत शिक्षक



तसेच विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना इ-कचराबद्दल सविस्तर माहिती देऊन विविध इ-कचरा संकलित केला. या मोहिमेअंतर्गत आपल्या घरातील आणि परिसरातील टाकाऊ इलेक्ट्रीक वस्तु संकलित करुन विद्यालयात जमा केले.

मुख्याध्यापक विजय वळवी यांनी विद्यार्थ्यांना इ-कचरा संकलनाचे महत्व व फायदे पटवून दिले. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, रॅलीची सांगता सरपंच रिना गोविंद व मुख्याध्यापक शरद जाधव यांच्या मार्गदर्शनाने झाली. कार्यक्रमासाठी आर. के. पवार, संजीव वळवी, बी.बी. पाटील, एस.एम. मराठे, पंकज पाटील, ईश्वर पाटील, व्ही.डी. पाटील, आर.एस. शिरसाळे, हिरालाल पाटील, मनोज पाटील, भारती पवार, शिवाजी सोनवणे आदींनी परिश्रम घेतले.

## रायंगण प्रकल्प पर्यटनस्थळ घोषणेस दिरंगाई; राष्ट्रवादीचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील रायंगण प्रकल्प, बोरपाडा येथे नवीन पर्यटनस्थळ घोषित करण्यास प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या प्रदेश सचिव दिपांजली दिवानजी गावीत यांनी बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.**

उपोषणास बसण्याची परवानगी देण्याबाबतचे निवेदन



त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांना सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे, दि. १२/०१/२०२६ रोजी रायगण प्रकल्प बोरपाडा येथे नवीन पर्यटनस्थळ घोषित करण्याबाबत लेखी मागणी करण्यात आली होती. मात्र आजतागायत त्या निवेदनावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. यामुळे आदिवासी समाजाच्या विकासाला चालना देणाऱ्या या प्रस्तावाकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. प्रशासनाकडून तत्काळ निर्णय न झाल्यास दि. २१ जानेवारी पासून स्वतः सह पक्षाचे पदाधिकारी, विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांसह बेमुदत उपोषणास बसणार आहेत. निवेदनावर दिपांजली दिवानजी गावीत, मनोज गावीत सरपंच काशीराम गावीत, उपसरपंच योहान गावीत यांच्या सहया आहेत.

## किसान अध्यापक महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी टीईटी परीक्षेत उत्तीर्ण

प्रतिनिधी । बोराडी

किसान विद्या प्रसारक संस्था संचलित किसान अध्यापक महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी नोव्हेंबरमध्ये झालेल्या शिक्षक पात्रता परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाच्या यशात भर घातली आहे. टीईटी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मनोज राजेंद्र राजपूत (९४ गुण), अंकिता भगवान बागुल (१०५ गुण) व उन्नती देविदास मोकाशे (१०७गुण) यांचा समावेश आहे. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सचिव निशांत रंधे, खजिनदार आशाताई रंधे व विश्वस्त व नगरसेवक रोहित रंधे, प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत, उपप्राचार्य प्रा. व्ही.ए.चव्हाण, प्राचार्य पी.आर. पाटील, उपशिक्षक सारिका ततार, कन्हैया कोळी, दीपक बंजारा यांनी कौतुक केले.

## सहकार आयुक्तांकडून पतसंस्थांच्या कामकाजाची पाहणी

प्रतिनिधी । नंदुरबार

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे दिपक तावरे यांनी जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या प्राथमिक कृषी पतपुरवठा पतसंस्थांच्या संगणकीकरणाच्या कामकाजाची पाहणी करण्यासाठी नुकतीच भेट देवून पाहणी केली.**

नवापूर तालुक्यातील विसरवाडी आणि भरडू येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना भेट देऊन प्रत्यक्ष संगणकीकरणाच्या कामकाजाची पाहणी केली व सचिवांना मार्गदर्शन केले. संगणकीकरणामुळे सभासदांना तात्काळ पीक कर्ज उपलब्ध होऊ शकेल, तसेच अभिलेखे स्वहस्तलिखित लिहिण्याची पद्धत बंद होऊन अपहार व गैरव्यवहार थांबतील, असे मार्गदर्शन त्यांनी केले. त्याच दिवशी संध्याकाळी, त्यांनी नंदुरबार तालुक्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा पतसंस्थांच्या संगणकीकरणाच्या कामकाजाचा आढावा घेतला.नंदुरबार जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यामध्ये ई-ऑफिस व ई-मोड्यूलबाबत प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी करून सूचना व मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा उपनिबंधक रविंद्र पाटील, सहाय्यक निबंधक, नवापूर तालुका जिल्हा बँकेचे शाखाधिकारी, बँक तपासनीस तसेच संध्याकाळच्या आढाव्यात विभागीय सहनिबंधक, नाशिक विभाग संभाजी निकम व संस्थेचे सचिव आदी उपस्थित होते.

## खा.शोभा बच्छावांच्या घरासमोर पेन्शर्स फेडरेशनची निदर्शने



प्रतिनिधी । धुळे

**कुटुंब निवृत्ती वेतन योजना (ईपीएस-९५) अंतर्गत किमान ९ हजार पेन्शन, त्यावर महागाई भत्ता व आरोग्य सेवेचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी जिल्हा ईपीएस ९५ पेन्शर्स फेडरेशनतर्फे धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खासदार शोभा बच्छाव यांच्या देवपूरातील निवासस्थानासमोर निदर्शने करण्यात आली.**

औद्योगिक व खाजगी आस्थापना, साखर कारखाने, महामंडळे, सहकारी बँका, पावरलूम, गिरण्या तसेच लघु व मध्यम उद्योगांतील कामगारांसाठी केंद्र सरकारने १९५२ मध्ये कुटुंब निवृत्ती वेतन योजना लागू केली. १९९५ पासून ही योजना सक्तीची करण्यात आली असली तरी गेल्या सुमारे ३० वर्षांत पेन्शनमध्ये कोणतीही लक्षणीय वाढ झालेली नाही. आजही बहुसंख्य सेवानिवृत्तांना १ ते ३ इतकीच तुटपुंजी पेन्शन मिळत आहे. डॉ. भगतसिंग कोशियारी समितीने किमान ३ हजार पेन्शन व महागाई भत्ता देण्याची शिफारस केली होती; मात्र ती अद्याप अंमलात आलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाने २०१६ व २०२० मध्ये कामगारांच्या बाजूने निकाल देऊनही ईपीएफओकडून अंमलबजावणी होत नसल्याचेही निवेदनात नमूद आहे.

ईपीएस-९५ योजनेत केंद्र सरकारवर अतिरिक्त आर्थिक भार पडत नसून, कामगारांच्या वर्गणीवरील व्याजातूनच पेन्शन देण्यात येते. देशभरात सुमारे ७५ ते ८० लाख ईपीएस-९५ पेन्शनधारक अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत असून वाढते वय, आजारपण व औषधोपचार खर्चामुळे त्यांची स्थिती बिकट झाली असल्याचे निवेदनात नमूद आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तातडीने पेन्शन वाढ, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा लागू कराव्यात, अन्यथा १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप व तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात कॉं. पोपटराव चौधरी, कॉ. एल.आर. राव, देविसिंग जाधव आदी सहभागी झाले होते.

# अपार आयडीसाठी गुणपत्रिकेची आवश्यकता नाही

## तपशिलांतील तफावतीमुळे कोणताही अर्ज बाद केला जाणार नाही; सीईटी कक्षाने केले स्पष्ट

प्रतिनिधी । धुळे

**सीईटी अर्ज करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी अपार आयडी तयार करणे आवश्यक आहे. याची प्रक्रिया अतिशय सोपी व सुलभ आहे. यात उमेदवारांना दहावी किंवा बारावीच्या गुणपत्रिकेतील तपशील भरण्याची आवश्यकता नाही. अशा शैक्षणिक तपशिलांचा अभाव असल्यामुळे कोणत्याही उमेदवाराला अपार आयडी तयार करण्यास किंवा सीईटी अर्ज सादर करण्यास अडथळा येणार नाही. तसेच तपशिलांतील तफावतीमुळे कोणताही अर्ज बाद केला जाणार नाही, असे सीईटी कक्षाने स्पष्ट केले आहे.**

विद्यार्थ्यांना सीईटीसाठी ऑनलाइन अर्ज भरताना वैयक्तिक अथवा लोकसंख्याशास्त्रीय (डेमोग्राफिक) तपशिलांमध्ये तफावत असल्यामुळे अडचणी येत असल्याच्या काही तक्रारी येत आहेत. याची दखल घेत वरील स्पष्टीकरण देण्यात आले आहे.




तपशिलांमध्ये तफावत असल्यावरून कोणताही सीईटी अर्ज अपात्र, नामंजूर किंवा बाद करण्यात येत नाही, असे सीईटी कक्षाने स्पष्ट केले आहे. नाव, जन्मतारीख इत्यादी तपशिलांतील फरकामुळे उमेदवाराच्या पात्रतेवर कोणताही परिणाम होत नाही, असेही सांगण्यात आले. यामुळे सोपी होणार आहे. प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि बनावट कागदपत्रांना आळा घालणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**सीईटी अर्ज सादर करण्यावर शून्य परिणाम**

वैयक्तिक तपशिलांतील किरकोळ तफावतीमुळे सीईटी अर्ज सादर करण्यावर कोणताही परिणाम होत नाही. अशा तफावती आवश्यकतेनुसार पुढील टप्प्यावर निर्धारित कार्यपद्धतीनुसार दुरुस्त करता येतील. तेव्हा उमेदवारांनी घाबरून न जाता अथवा अफवांवर विश्वास न ठेवता, आपल्या वैध पुराव्यांनुसार अर्ज काळजीपूर्वक भरावा. तांत्रिक अडचणींसाठी सीईटी पोर्टलवर उपलब्ध अधिकृत मदत केंद्र , हेल्पडेस्कशी संपर्क साधावा, असे आवाहनही केले आहे. सीईटी अर्ज प्रणालीत उमेदवारांना त्यांचे नाव, जन्मतारीख व इतर वैयक्तिक तपशील वैध पुराव्यानुसार हाताने भरण्याची पुरेशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांनी आधार कार्ड, बारावी प्रमाणपत्र किंवा इतर मान्य दस्तऐवजांनुसार माहिती भरावी.

# जळगाव-उधना रेल्वे लाईनवर ट्रेन टक्कर प्रतिबंधक सुरक्षा 'कवच' बसवणार

प्रतिनिधी । जळगाव

**रेल्वे सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेच्या अंब्रेला वर्क २०२४-२५ अंतर्गत पश्चिम रेल्वेवर 'कवच' ट्रेन टक्कर प्रतिबंधक प्रणाली अंमलात आणण्यासाठी दोन महत्त्वाची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या प्रस्तावाची एकूण अंदाजित किंमत ४८३.६५ कोटी आहे. जळगाव-उधना या ३०७ कि.मी. लांबीच्या महत्त्वाच्या विभागात सुरक्षा 'कवच' प्रणाली बसविण्याचा प्रस्ताव असून, यासाठी १०९.८३ कोटी खर्च अपेक्षित आहे.**

या संदर्भात 'दै. शौर्य मराठी'च्या प्रतिनिधीला माहिती देताना झेडआरयुसीसी सदस्य, पश्चिम रेल्वे मुंबई तथा खान्देश रेल्वे असोसिएशनचे सदस्य प्रतीक जैन यांनी सांगितले की, या उपक्रमांमुळे खान्देशातून जाणाऱ्या ६० गाड्यांना फायदा होणार आहे. तसेच भारतीय रेल्वेच्या सुरक्षा पायाभूत सुविधांना मोठे बळ मिळणार आहे. आधुनिक आणि अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली जलदगतीने अंमलात आणण्याबाबतची भारतीय रेल्वेची कटिबद्धता यामुळे अधोरेखित होते. या प्रस्तावित कामांमुळे पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांची सुरक्षितता अधिक भक्कम होणार असून, रेल्वे सुरक्षेच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.



या प्रणालीमुळे ट्रेन टक्कर टाळणे, सिग्नल उल्लंघन रोखणे आणि एकूण परिचालन सुरक्षेत लक्षणीय वाढ होणार आहे. पश्चिम रेल्वेच्या ४३६ इंजिनांचे उन्नयन व प्रोग्रामिंग कवच प्रणालीचे सुरळीत व प्रभावी कार्य सुनिश्चित करण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या ४३६ विद्यमान इंजिनांमध्ये आवश्यक सुधारणा, उन्नयन आणि प्रोग्रामिंग करण्यात येणार आहे.

यासाठी ३७३.८२ कोटींची तरतूद प्रस्तावित आहे. ही दोन्ही कामे भारतीय रेल्वेच्या व्यापक अंब्रेला प्रोजेक्टचा भाग आहेत. या प्रकल्पांतर्गत भारतीय रेल्वेच्या उर्वरित मार्गांवर दीर्घकालीन विकास संप्रेषण बॅकबोनसह कवच प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी वर्क्स, मशीनरी अँड रोलिंग स्टॉक प्रोग्राम अंतर्गत २७,६९३ कोटी खर्चास मान्यता दिली जाणार आहे. यामधून पश्चिम रेल्वेसाठी २,८०० कोटींची उप-अम्ब्रेला तरतूद रेल्वे विभागाकडून मंजूर करण्यात आली आहे.

## धरणगावात महाराणा प्रतापसिंह पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी । धरणगाव



**शौर्य, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रती अढळ निष्ठेचे प्रतीक असलेले महान योद्धे महाराणा प्रतापसिंह यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराणा प्रतापसिंहजी यांच्या स्मारकाजवळ राजपूत समाजाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराणा प्रतापसिंहजी यांच्या स्मारकाचे विधिवत पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात जितेंद्र परदेशी यांच्या प्रास्ताविकाने झाली. लोकनियुक्त नगराध्यक्षा लिलाताई चौधरी यांच्याहस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उपनेते तथा रावेर व नंदुरबार जिल्हा संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या पराक्रम, स्वराज्यनिष्ठा आणि परकीय सत्तेविरुद्ध केलेल्या संघर्षाचा गौरव करत त्यांच्या विचारांची आजच्या पिढीला प्रेरणा देणारी भूमिका स्पष्ट केली. महाराणा प्रतापसिंह हे केवळ एक राजे नव्हते, तर स्वाभिमानासाठी सर्वस्व अर्पण करणारे राष्ट्रनायक होते. मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी अपार कष्ट सोसले, संकटांशी सामना केला आणि कधीही शरणागती स्वीकारली नाही. त्यांचे जीवन संघर्ष, त्याग आणि स्वराज्य प्रेमाचे जिवंत उदाहरण असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास राजपूत समाजाध्यक्ष जीवनसिंह बयस, ज्येष्ठ नागरिक सतीश आप्पा, नगरसेवक निलेश चौधरी, परमेश्वर महाजन, कडूसिंह बयस, ललित येवले, हेमंत महाजन, लक्ष्मण माळी, नूतन सोसायटीचे चेअरमन विश्वास बयस, शामसिंह चव्हाण, जगदीश चव्हाण, रणजीत शिकरवार, प्रथम सूर्यवंशी, मुकेश बयस, धिरेंद्र पुरभे, मुकेश चव्हाण, यशपाल चंदेल, अ‍ॅड.हर्षल चौहान, संकेत चंदेल, गणेश बयस, नितीन चौहान, गणेश चौहान, प्रकाश बयस, निलेश बयस, विवेक बयस, सागर बयस, खुशवंत सिकरवार, महेंद्र बयस, कल्पेश विसावे, दावू राजपूत, कपिल जनकवार, राहुल चव्हाण, जिगर जनकवार आदी मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव चौहान यांनी तर आभार गणेश सूर्यवंशी यांनी मानले.

## थोडक्यात

### तालुका विधी समितीतर्फे कायदेविषयक जनजागृती

**भुसावळ ।** तालुका विधी सेवा समितीतर्फे बालाजी लॉन मागील राधानगर येथे विधी शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये प्रमुख वक्ते अ‍ॅड. मनीषा बाविस्कर यांनी महिलांना बालविवाह संबंधी कायद्याविषयी तरतुदी कायद्याबाबत माहिती तसेच ज्येष्ठ नागरिक यांना कायद्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच कायदेविषयक पत्रके वाटप केली. कार्यक्रमाचे आयोजन विधी सेवा समितीच्या पीएलव्ही रूपाली नेवे यांनी केले होते. त्यांना पीएलव्ही स्वाती भोळे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास लतिका नेहते, सुमन महाजन, मनीषा खाचणे, संध्या कळमकर, लता बेंडाळे, कल्पना चौधरी, मीना वायकोळे, शालिनी चौधरी, रोहिणी पाटील, चैताली बानाईत, सुलोचना बोंडे आदी उपस्थित होते. संपूर्ण ज्येष्ठ नागरिकांचे रूपाली नेवे यांनी आभार मानले. यानंतर तिळगुळ वाटप व हळदीकुंकू कार्यक्रम घेण्यात आला.

## राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने कलाशिक्षक कमलेश गायकवाड सन्मानित

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेतर्फे तात्यासाहेब ज्योतिबा फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार यावर्षी प्रताप विद्यामंदिर चोपडा येथील कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांना देण्यात आला. विशेष बाब म्हणजे राज्यातून फक्त पाच शिक्षकांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.**



● उपक्रमशील, विद्यार्थी प्रिय, कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांना यापूर्वी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पुरस्कार, भारत सरकार गृह मंत्रालय, सशस्त्र सीमा बल, जळगाव जिल्हा पोलीस दल, भारत सरकार निवडणूक आयोग तसेच विविध शैक्षणिक सामाजिक संस्था, संघटनांकडून प्रशंसापत्र, गौरवपत्र, पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

पालकमंत्री गुलाबराव पाटील, शिक्षक आमदार किशोर दराडे, डि.के अहिरे आदींच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील अल्पबचत भवन येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. आकर्षक सन्मानचिन्ह, शाल, समतांगण विशेषांक, पुस्तके, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. कमलेश गायकवाड यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन राजाभाई मयूर, अध्यक्षा शैलाबेन मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ अग्रवाल, सचिव माधुरी मयूर, चंद्रहास गुजराथी, भूपेंद्र गुजराथी, संस्था समन्वयक गोविंद गुजराथी, डी.टी. महाजन, मुख्याध्यापक प्रशांत गुजराती, उपमुख्याध्यापक एम.डब्ल्यू. पाटील, उपप्राचार्य जे.एस. शेलार, पर्यवेक्षक अतुल भट, पर्यवेक्षक पंकज नागपुरे, पर्यवेक्षक एस.व्ही. करमरकर आदींनी शुभेच्छा दिल्या. जळगाव जिल्हा कलाध्यापक संघ, चोपडा तालुका कलाध्यापक संघ, विविध शैक्षणिक संघटना, सामाजिक संघटना यांनीही चित्रकार, कवी, छायाचित्र, कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांचे शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष प्रा.भरत शिरसाट यांनी कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांच्या कलाक्षेत्रातील विशेष कार्याची दखल घेत या राज्य पुरस्काराची निवड करण्यात आली असे प्रास्ताविकेत सांगितले. सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब सोनवणे यांनी केले.

## रासेयोतर्फे आयोजित शिबिरात १०० जणांनी केली सिकलसेल रक्त तपासणी

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ.सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कार शिबिर शामराव शिवराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय चहार्डी येथे आयोजित करण्यात आले होते. दि.२० जानेवारी रोजी सकाळी ११ ते १२ यादरम्यान राष्ट्रीय सेवा योजना वतीने चहार्डी गावातील विद्यार्थ्यांसाठी तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी सिकलसेल रक्त चाचणी तपासणी अभियान आयोजित करण्यात आले होते. या अभियानात १०० पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी सहभागी होऊन आपली सिकलसेल रक्ताची चाचणी करून घेतली.**



शामराव शिवराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ३० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या अभियानात सहभागी होऊन आपल्या सिकलसेल रक्ताची चाचणी केली. सदर अभियानासाठी चहार्डी येथील ग्रामीण रुग्णालयाचे विशेष सहकार्य मिळाले. या अभियानाला सुरुवात होण्यापूर्वी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कुणाल गायकवाड यांनी स्वयंसेवकांना या अभियानात सामील होण्याचे आवाहन केले. तसेच चहार्डी येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉ. महेंद्र पाटील यांनी स्वयंसेवकांना सिकलसेल आजाराबद्दल माहिती दिली व या आजाराचे लक्षण तसेच आजारांवरील उपाय यासंदर्भात जनजागृती पर मनोगत व्यक्त केले. अजिज खान यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची ही सिकलसेल चाचणी करून घेतली. या अभियानात महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आरती पाटील व मोहिनी पाटील यांनी सहभाग घेतला. दि. २० जानेवारी रोजी संध्याकाळी ५ ते ६ दरम्यान चहार्डी येथील भाऊसो शामराव शिवराम पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील परिसरात सुशोभीकरण व परिसरातील झाडांना रंगरंगोटी करून झाडांचे आयुष्यमान वाढवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी डॉ.कुणाल गायगवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महत्त्वाचे योगदान दिले. झाडांना कीटक व बुरशीपासून संरक्षण मिळावे,सूर्याच्या तीव्र किरणांपासून झाडांच्या खोडाचे बचाव होऊन ज्यामुळे झाडाचे खोड मजबूत व्हावे, असे विविध उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून स्वयंसेवकांनी हे कार्य केले. स्वयंसेवकांनी केलेल्या या कार्याचे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले.

## वडती विकासो चेअरमनपदी धनगर, व्हा.चेअरमनपदी पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वडती विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमनपदी शरद युवराज धनगर(रा.नरवाडे) तर व्हाईस चेअरमनपदी कमलाकर साहेबराव पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.**



विविध कार्यकारी सोसायटी सभागृहात सकाळी बैठक होऊन सर्वानुमते चेअरमनपदी शरद धनगर तर व्हाईस चेअरमनपदी कमलाकर पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब होऊन संचालक मंडळ घोषित करण्यात आले.या यावेळी विकास सोसायटी संचालक डॉ .भरत धनगर, खुशाल पाटील, समाधान धनगर, अंकुश पाटील, बापू धनगर जयराम कोळी, धनराज धनगर, तज्ज्ञ संचालक जी सी पाटील, विठ्ठल धनगर, फिरोज तडवी,बबनबाई धनगर, गंगुबाई भिल्ल, तसेच सचिव चंपालाल जाधव व क्लार्क अमिन पिंजारी उपस्थित होते.

### विकास महाजन यांचा सन्मान

**अमळनेर ।** तालुक्यातील कळमसरे येथील शारदा माध्यमिक विद्यालय व एन.एम. कोठारी कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी विकास प्रल्हाद महाजन यांची नियुक्ती झाली. त्यांच्या निवडीबद्दल माळी समाज पंच मंडळ व समस्त माळी समाज बांधवातर्फे त्यांचा श्रीराम मंदिरात सत्कार करण्यात आला. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडती येथील कुमार कंडारे यांना काव्यरत्न पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वडती येथील कुमार राधेशाम कंडारे यांना काव्यरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा मंचच्या नाशिक शाखेच्यावतीने गुरुवार, दि.२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या नाशिक जिल्हास्तरीय समरसता साहित्य संमेलनात त्यांना या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.**



कुसुमाग्रज स्मारकाच्या विशाखा सभागृहात हा समारोह पार पडणार आहे. या समरसता संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिध्द कीर्तनकार आणि कवी ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर-आळंदीकर हे भूषविणार आहेत. विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्याकडून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील ५१ कवींची निवड करण्यात केली आहे. त्यांना गौरवपदक, महावस्त्र, श्रीफळ व मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे. कुमार राधेशाम कंडारे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सरपंच, उपसरपंच, सदस्य, नागरिक, पुज्य साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

## धरणगाव-पुणे बस पूर्ववत सुरू करा

### प्रवासी मंडळाची मागणी; आगारप्रमुखांना निवेदन

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव-पुणे बस सेवा पूर्ववत सुरू करण्यासह धरणगाव तालुक्यातील विविध महत्त्वाच्या बस सेवांबाबत धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्यावतीने एरंडोल आगारप्रमुख बेंडकुळे यांना निवेदन सादर करण्यात आले.**

प्रवासी मंडळाने दूरध्वनीद्वारे संपर्क साधल्यानंतर आगार प्रमुख बेंडकुळे यांनी स्वतः धरणगाव येथे भेट देत प्रवासी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी प्रवाशांच्या अडचणी, गरजा व मागण्या त्यांनी समजून घेतल्या. याप्रसंगी 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाचा प्रत्यक्ष अनुभव प्रवाशांना मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. प्रवासी मंडळाच्यावतीने धरणगाव-पुणे बससेवा पूर्ववत सुरू करावी, धरणगाव-जळगाव शटल बस सुरू करावी, दुपारच्या वेळेस धुळे येथे जाण्यासाठी नवीन बससेवा सुरू करावी, सकाळी ९ वाजेच्या सुमारास धरणगाव -नाशिक बस सुरू करावी, रात्रीच्या वेळेस धरणगाव-पुणे स्लीपर बससेवा सुरू करावी, चोपडा-चाळीसगाव बसला गणेशनगर येथे थांबा द्यावा, सकाळी रेल्वेशी संलग्न बससेवा सुरू करावी, जळगाव-नवसारी बससेवा पूर्ववत सुरू करावी, धरणगाव बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी बसण्याकरिता बेंचेसची व्यवस्था करावी, अशा विविध मागण्या मांडण्यात आल्या. यावेळी बेंडकुळे यांनी सर्व मागण्यांचा वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी, रवींद्र भागवत, एस.डब्ल्यू. पाटील, किरण वाणी, हितेश पटेल, सुनील चौधरी, आनंद बाचपेयी, राजेंद्र पडोळ, राजेश मकवाने, डॉ. पंकज अमृतकर, डॉ.स्वप्नील पाटील, अ‍ॅड.हर्षल चौहाण, किरण परिहार, बाबा कासार, सुदाम चौधरी आदी उपस्थित होते.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्युनिसिपल स्कूलला नगराध्यक्षासह मुख्याधिकारींची भेट

### विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकास व कौशल्य वृद्धीसाठी रोड मॅप तयार करण्याच्या सूचना

प्रतिनिधी । चोपडा

**नगरपरिषद संचलित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले म्युनिसिपल हायस्कूल येथे मंगळवार दि.२० रोजी नगराध्यक्षा नम्रताताई पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेच्या एकूण कामकाजाबाबत सविस्तर माहिती घेतली.**



शाळेतील विद्यार्थी पटसंख्या, विद्यार्थ्यांचा पोषण आहार, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे, शालेय गणवेश तसेच इतर मूलभूत सोयीसुविधांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी व कौशल्यवृद्धीसाठी आवश्यक सुधारणा कशा प्रकारे करता येतील, याबाबत नियोजन करून रोड मॅप तयार करण्याचे सुचविण्यात आले. तसेच मान्यवरांनी शाळेतील भूगोल प्रयोगशाळा, क्रीडांगण, स्वच्छतागृहे, परसबाग, डिजिटल क्लासरूम आदी विविध विभागांना भेट देऊन पाहणी केली.

शाळेतील अडचणी व समस्या जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून, नियमित बैठका घेऊन शाळेच्या समस्या सोडवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य व पाठबळ देण्याचे आश्वासन नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांनी दिले.

## पंकज बालसंस्कार केंद्रात सर्वांगीण विकासासाठी उपक्रम



प्रतिनिधी । चोपडा

**पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज बालसंस्कार केंद्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'वाटाण्याच्या शेंगा निवडणे' हा जीवनोपयोगी उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.**

आनंददायी, हसत-खेळत आणि कृतीयुक्त शिक्षण या तत्त्वावर आधारित या उपक्रमामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील कामांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची भावना रुजविण्याबरोबरच बोटांच्या स्नायूंचा विकास, सूक्ष्म हालचालींचा सराव, निरीक्षण क्षमता व एकाग्रतेत वाढ झाली. तसेच प्रत्यक्ष अनुभवातून शिकल्यामुळे विद्यार्थ्यांची आकलनशक्ती अधिक सक्षम झाली. मुलांनी आनंदाने व उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. या उपक्रमाचे मार्गदर्शन मुख्याध्यापक एम.व्ही. पाटील व विभागप्रमुख मीना माळी यांनी केले. अशा जीवनोपयोगी उपक्रमांमुळे बालकांचा शारीरिक, बौद्धिक व भावनिक विकास घडून येत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.